N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म-I)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नाशिक ग्रामीण **P.S.(ठाणे):** त्र्यंबकेश्वर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0036 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/02/2024 23:37

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 09/02/2024
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 09/02/2024
**Time From (वेळेपासून):** 13:34 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:02 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 09/02/2024 **Time (वेळ):** 23:37 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 031
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/02/2024 23:37 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 12 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तळेगांवअं येथील ग्रामपंचायत ,नाशिक

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** त्र्यंबकेश्वर
**District(State) (जिल्हा(राज्य)):** नाशिक ग्रामीण(महाराष्ट्र)

**6. Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): मोहन परशराम दाते

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : परशराम दाते

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1966

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | तळेगाव अं,नाशिक,त्र्यंबकेश्वर,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | तळेगाव अं,नाशिक,त्र्यंबकेश्वर,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9850841633

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | ज्ञानेश्वर शांतराम शिंपी | | वडील का नाम : शांतराम शिंपी | 1. आशापुरी रो हाऊस, श्रीराम नगर ,,नाशिक,त्र्यंबकेश्वर, नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 25,000/ रूपये. | 25,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

25,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद त्रंबकेश्वर पोलीस ठाणे

दि. 09/2/2024

माझे नाव मोहन परशराम दाते, वय 58 वर्षे, व्यवसाय-शेती, रा. मु.पो. तळेगाव (अं), ता.जि. नाशिक मोबाईल क्र. 9850841633.

समक्ष पोलीस ठाण्यात हजर राहुन फिर्याद देतो की, मी वर नमुद ठिकाणी माझे तीन मुले व पत्नीसह वास्तव्यास असुन मी शेती व्यवसाय करुन माझा व कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. माझा मुलगा नामे गोकुळ मोहन दाते यांचे बी.ई. सिव्हील पावेतो शिक्षण झाले असुन तो शासकीय ठेकेदार म्हणुन काम करतो.

माझा मुलगा नामे गोकुळ यास तळेगांव (अं) ता.जि.नाशिक यांचेकडुन तळेगाव (अं) येथील स्मशानभुमी संबंधी रुपये 9,96,538/-रुपयांचे कामकाज मला मिळाले आहे. आम्ही तळेगांव (अं) येथील स्थानिक रहिवासी असल्याने व माझे तळेगांव (अं) ग्रामपंचायत तसेच पंचायत समिती नाशिक येथे ओळख परिचय असल्याने सदर कामाचे अनुशंगाने शासकीय कार्यालयातील कामकाजाकरिता मी नेहमी ग्रामपंचायत तळेगाव (अं) , पंचायत समिती नाशिक येथे जात असतो.

या कामासाठी माझे मुलास शासकीय फी कापुन 7,47,174/-रुपये मिळालेले आहेत. तसेच उर्वरीत 2,00,000 रुपये बिलाचे अनुदान मंजुरीकामी प्रस्ताव सादर करुन सदरची रक्कम अदा करणेकरिता विनंती करिता मी दिनांक 8/2/2024 रोजी तळेगांव (अं) येथील ग्रामपंचायत येथील ग्रामसेवक यांचेकडे गेलो असता त्यांनी मला या बिलाचे अनुदान मंजुर करण्याचा प्रस्ताव सादर करणेकरिता 25,000/-रुपयांची मागणी केली त्यावेळी मी त्यांना पाहतो म्हणुन सांगून तेथुन निघुन आलो.

ग्रामपंचायत तळेगांव (अं) येथील ग्रामसेवक श्री. शिंपी हे माझेकडे माझे मुलाचे तळेगाव (अं) स्मशानभुमीचे कामाच्या उरलेल्या बिलाचे अनुदान मंजुरी प्रस्ताव सादर करणेसाठी ते माझेकडे 25,000/-रुपये लाचेची मागणी करीत असलेबाबत माझी खात्री झाल्याने मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक येथे श्री. परशुराम कांबळे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक यांचेशी दिनांक 8/2/2024 रोजी संपर्क केला असता मी त्यांना दिनांक 9/2/2024 रोजी तळेगांव (अं) येथे येण्यास सांगितले त्याप्रमाणे श्री.परशुराम कांबळे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि., नाशिक हे सापळा पथकासह तळेगांव (अं) येथील बेलगांव-तळेगाव (अं) येथील माझे शेतात आले तेव्हा मी दिनांक 9/2/2024 रोजी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने पोलीस निरीक्षक श्री.परशुराम कांबळे साहेबांनी दिनांक 9/2/2024 रोजी माझे तक्रारीप्रमाणे ग्रामपंचायत तळेगांव(अं) येथील ग्रामसेवक श्री. शिंपी हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची पडताळणी करणेकामी मला व कांबळे साहेबांनी सोबत आणलेले पंच श्री. जर्नादन घंटे अशांना पडताळणी कारवाईकामी आवश्यक सुचना देवुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन देवुन माझेकडील मारुती कंपनीचे चारचाकी वाहन क्र. एम.एच.15 एफ.एफ.4235 ने 11/14 वाजेचे सुमारास बेलगांव-तळेगाव (अं) येथील माझे शेतातुन लोकसेवक श्री. शिंपी यांचे भेटीकरिता ग्रामपंचायत कार्यालय तळेगांव (अं)येथे रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच श्री. जनार्दन घंटे असे ग्रामपंचायत कार्यालय तळेगाव(अं)येथे ग्रामसेवक श्री.शिंपी यांचे कक्षात जावुन त्यांची भेट घेतली असता त्यांनी माझे तक्रारीत नमुदप्रमाणे माझे मुलास तळेगांव(अं) येथील स्मशानभुमी संबंधी कामकाजाचे उर्वरीत 2,00,000/- रुपये बिलाचे अनुदान मंजुरीकामी प्रस्ताव सादर करुन सदरची रक्कम अदा करणेकरिता माझेकडे 25000/- रुपयांची मागणी करुन सदरची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले असुन तसा पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.

त्यांनतर दिनांक 9/2/2024 रोजी माझेकडील 500/-रुपये दराच्या 50 चलनी नोटांना अँन्थ्रासीन पावडर लावुन सदर नोटा व व्हॉईस रेकॉर्डरसह मला व पंच श्री. जनार्दन घंटे यांना ग्रामसेवक श्री.शिंपी यांचे भेटीकरिता आवश्यक त्या सुचना देवुन 13/34 वाजेचे सुमारास बेलगांव-तळेगाव (अं) येथील माझे शेतातुन माझेकडील मारुती कंपनीचे

चारचाकी वाहन क्र. एम.एच.15 एफ.एफ.4235 ने रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच श्री. जनार्दन घंटे असे ग्रामपंचायत कार्यालय तळेगांव (अं) येथे जावुन तेथील ग्रामसेवक श्री.शिंपी यांची भेट घेतली. सदर भेटीचे वेळी श्री. शिंपी यांनी मागणी केलेल्या 25,000/-रुपये लाचेची रक्कम ज्यात 500 रुपये दराच्या 50 चलनी नोटा श्री.शिंपी यांनी पंच साक्षीदारासमक्ष त्यांचे समोर लाकडी टेबलावर ठेवण्यास सांगितल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असुन सदर कारवाई बाबत सविस्तर यशस्वी सापळा पंचनामा करण्यात आला आहे.

तरी लोकसेवक श्री. ज्ञानेश्वर शांताराम शिंपी, वय 42 वर्षे, ग्रामसेवक, वर्ग 3, नेम. तळेगांव (अं) ता.जि.नाशिक यांनी माझे मुलास तळेगांव(अं) येथील स्मशानभुमी संबंधी कामकाजाचे उर्वरीत 2,00,000/-रुपये बिलाचे अनुदान मंजुरीकामी प्रस्ताव सादर करुन सदरची रक्कम अदा करणेकरिता माझेकडे 25000/-रुपयांची मागणी करुन सदरची रक्कम दिनांक 9/2/2024 रोजी 14/02 वाजेचे सुमारास ग्रामपंचायत कार्यालय तळेगांव(अं) येथील कक्षात पंच साक्षीदारासमक्ष स्विकारली. यावरुन लोकसेवक श्री. ज्ञानेश्वर शांताराम शिंपी, वय 42 वर्षे, ग्रामसेवक, वर्ग 3, नेम. तळेगांव (अं) ता.जि.नाशिक यांनी भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने स्वतःसाठी पैशांच्या स्वरुपात लाभ मिळविण्याची व्यवस्था करुन गुन्हेगारी स्वरुपाचे वर्तन केल्याने त्यांचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याप्रमाणे माझी कायदेशीर फियार्द आहे.

माझी वरील फियार्द मी वाचुन पाहिली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेली आहे.

समक्ष
हि फिर्याद दिली
दि. 09/02/2024

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

bipin popatrao shewale(I (Inspector)) / dgpbpsm7502 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** bipin popatrao shew
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** dgpbpsm7502

पोलीस ठाणे अंमलदार
त्र्यंबकेश्वर पोलीस ठाणे
नाशिक ग्रामीण